
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष : ४ । अंक : १ । मार्च २०२१ (मासिक) । मूल्य ₹ १०० । AED 10 | US$ 2 www.panthastha.com



# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| फॉर्म IV | २ |
| १. संपादकीय – जीडीपी – विकासाचे फसवे परिमाण | ४ |
| २. बंगला – कविता – गणेश पोटफोडे | ८ |
| ३. वर्क फ्रॉम होम – सी ए धवल नांदेडकर | ९ |
| ४. कविता – स्नेह–वन्दन – सतीश शर्मा, इंदौर | ११ |

विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

विश्व पांथस्थ
वर्ष ४ अंक १
मार्च २०२१

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य

राजन तावडे, अबू धाबी
गजानन खोलगडे, बहरीन
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद
किशोर मुंढे, अजमान

मुखपृष्ठ आणि सजावट
सौ.मानसी कुलकर्णी,(मानसी आर्टस्)पुणे

मूल्य ₹ 100 | AED 10| US$2

Vishwa Panthastha
Year 4 Issue 1
March 2021

First Marathi Monthly For NRI Maharashtrian

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde, Abu Dhabi
Gajanan Kholgade, Bahrain
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
Nitin Gaikwad - Aurangbad
Kishor Mudhe, Ajman

Cover & Design
Manasi Kulkarni (Manasi Arts) Pune

Price : ₹ 100 AED 10 US$ 2


विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए–७०३, निसर्ग सिटी–२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
संपादक – संदीप वसंतराव कडवे
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)

या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

विश्व पांथस्थ



# जीडीपी- विकासाचे फसवे परिमाण

राष्ट्राची प्रगती मोजणारे जीडीपी हे सर्वात फसवे परिमाण किंवा मानदंड आहे हे मी सुरवातीलाच सांगून टाकतो. त्यामुळे यापुढील काही चर्चा केवळ लोकशिक्षणासाठी तांत्रिक स्वरूपाची असेल व जनसामान्याला हेतुपुरस्सर दिशाभूल करण्याचे पातक माझ्या माथी लागणार नाही.

तर जीडीपी हा अर्थशात्रज्ञाचा सर्वात आवडता शब्द आहे. आणि सर्वसामान्यांना अजिबात न कळलेला शब्द. तरीही सर्वत्र वापरला जाणारा हा शब्द. सध्या जीडीपी ला जीव्हीए म्हणजे ग्रॉस व्हॅल्यू एडिशन असा एक नवीन शब्द निर्माण केला आहे. एकूण एकच.

राष्ट्राचे उत्पन्न म्हणजे काय असते? तर राष्ट्रात निर्माण झालेल्या सर्व सेवा व वस्तूंचे एकत्रित मूल्य म्हणजे सकल घरेलू किंवा राष्ट्रीय उत्पन्न. इतकी सोपी व्याख्या तुम्हाला अर्थशात्राच्या कुठल्याही पुस्तकात सापडणार नाही. कारण जीडीपी ची व्याख्या करणे सोपे नाही, मोजदाद करणे तर त्याहूनही कठीण आहे.

जीडीपीच्या च्या व्याख्येत समाविष्ट असलेल्या काही व्याख्या किंवा शब्दबद्ध केलेल्या संकल्पना आपण बघू.

साधारणपणे सर्व एकत्रित उत्पन्न किंवा सर्वांनी केलेला खर्च यांची बेरीज साधारण जवळपास सारखी असल्याने जीडीपी उत्पनावरून आणि खर्चावरून या दोन प्रकारे काढता येते. उत्पन्नावरून काढलेल्या जी. डी. पी. चा काही लोक जी डी पी (आय) असा उल्लेख करतात. यात सर्वांना मिळणारे वेतन, सर्व नोंदीत आणि अनोंदित आस्थापना किंवा संस्था यांचा करपूर्व नफा याची बेरीज करुन त्याना मिळालेली सरकारी मदत वजा करुन काढतात. तर खर्चावरून जी. डी. पी. काढणे अधिक शास्त्रशुद्ध असून त्यामध्ये सर्वानी केलेला खर्च, गुंतवणूक, सरकारचा खर्च आणि केलेली आयात व निर्यात यांतील फरक यांची बेरीज करुन काढली जातो. प्रत्येक देशाची जी. डी. पी. मोजण्याची पद्धत वेगवेगळी आहे. जीडीपी साठी सेवा व वस्तूंचे मूल्य ठरवण्यासाठी आधारभूत वर्ष ठरवण्यात येते, उदारणार्थ २०११-१२. म्हणजे समजा २०११-१२ मध्ये शंभर किलो (एक क्विंटल) गव्हाची किंमत १,८०० रुपये होती व २०२० मध्ये पन्नास किलो गव्हाची किंमत १,८०० रुपये होती तर जीडीपी मध्ये बदल झाला नाही का? तर २०११ आधारभूत वर्ष मानून एक किलो गव्हाची किंमत १८ रुपये गृहीत धरून पन्नास किलो गव्हाची किंमत ९०० रुपये झाली असे मानून ॲट

कॉन्स्टन्ट कॉन्स्टन्ट प्राईस, जीडीपी घटला असे मानण्यात येते. मग खर्चाच्या बाबतीत देखील हाच फॉर्मुला लागू होतो का? याचे सरळ उत्तर नाही, पण बहुतांशी नाही असेच म्हणावे लागेल. मग हा फरक कसा मोजला जातो आणि योग्य जीडीपी कसा निर्धारित केला जातो?

भारतात जी. डी. पी. मोजण्याचे कार्य केंद्रीय सांख्यकी विभाग (C. S. O.) यांच्याकडून केले जाते. ते दोन्ही प्रकाराने (उत्पादन आणि खर्च) त्याची मोजणी करुन निव्वळ व खरीखूरी (gross and inflection adjusted) आकडेवारी प्रसारित करतात. या दोन्ही मध्ये आठ उपविभाग असून त्यामुळे कोणत्या गोष्टींवर अधिक लक्ष दिले पाहिजे ते चांगल्या प्रकारे अधोरेखित होते. यासाठी आवश्यक माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे आणि त्याची नोंद ठेवून जतन करणे हे या विभागाचे काम आहे. विविध प्रकारचे सर्व्हेकरुन तसेच विविध केंद्र व राज्य सरकारी विभागात समन्वय साधून माहितीचे संकलक केले जाते, जसे शेतीचे उत्पन्न, घावूक बाजार निर्देशांक, औद्योगिक उत्पादन निर्देशांक, महागाई निर्देशांक इ. या सर्व माहितीचे पृथकरण करुन जी. डी. पी. काढला जातो. याची आकडेवारी तिमाही/वर्ष संपल्यावर दोन महिन्यांनी जाहीर केली जाते तसेच वेळोवेळी माहितीत जी भर पडते त्याप्रमाणे दुरुस्त केली जाते. पुढील तिमाही/वर्ष याबाबतीतील अंदाजही वर्तवला जातो. त्याच्याशी संबंधित घटक त्यांच्या जरूरीप्रमाणे या माहितीचा उपयोग करुन घेतात.

जीडीपी ठरवण्याचा व वर्तवण्याचा हा एव्हढा खटाटोप कशासाठी?

प्रचलित समजानुसार जी. डी. पी. हा आर्थिक प्रगतीचा मापदंड असल्याने त्याच्या आकडेवारीचा अर्थव्यवस्थेतील सर्व गोष्टींवर परिणाम होतो. जी. डी. पी. तील बदलांचा मग तो कमी होवो अथवा जास्त स्टॉक मार्केटवर ताबडतोब परिणाम होतो. जीडीपी ग्रोथ म्हणजे विकासदर पडला म्हणजे अर्थव्यवस्था अडचणीत आहे असा सरळ अर्थ काढला जातो. पण हे सर्वसत्य नाही. विकसनशील राष्ट्राचा विकासदर जास्त असतो कारण त्यांच्या अर्थव्यवस्थेचे पायाभूत अथवा आधारभूत मूल्यांकन सुरवातीला कमी असते. विकसित देशांच्या अर्थव्यवस्थेचे मूल्यांकन आधीच जास्त असते, त्यामुळे ग्रोथ रेट किंवा विकास दर कमीच असतो. पण आपल्याकडे जो समाज आहे त्यानुसार अर्थव्यवस्था खराब असणे म्हणजे कंपन्यांची नफाक्षमता कमी असणे समजले जाते ज्यामूळे शेअरचे भाव खाली येतात. अर्थात सेन्सेक्स किंवा निफ्टी हा शेअरबाजाराचा निर्देशांक म्हणजे अर्थव्यवस्थेचा बॅरोमीटर असा दुसरा महागैरसमज आहे. पण शेअरबाजार पडला म्हणजे गुंतवणुकदार चिंतीत होतात व गुंतवणूकदार चिंतित असतील तर अर्थतज्ञ अर्थव्यवस्था मंदीत असल्याचे भाकीत करतील. त्यामुळे कितीही दिशाभूल करणारा असला तरी जीडीपी हा एक अतिशय महत्वाचा निर्देशांक आहे हे निःसंशय. केवळ जीडीपीचा अंदाज वर्तवणे या उद्योगावर बऱ्याच जणांचे किंवा बऱ्याच सरकारी विभागांचे पोट भरते.

जर जी. डी. पी. दर चांगला असेल तर त्याचे खालील अर्थ काढले जातात. या मुद्द्यांचे खंडन देखील मी नंतर करणार आहे.

१. पहिला अर्थ असा होतो की देशात आर्थिक सुस्थिती आहे व समाजाच्या सर्व वर्गांना चांगले उत्पन्न मिळते. म्हणजे आनंदीआनंद आहे. (या मुद्द्याचे खंडन करण्यासाठी मला एक पुस्तक लिहावे लागेल, जे मी लिहितो आहे. इन्कलुसिव्ह ग्रोथ म्हणजे सर्वसमावेशक विकास हे संकल्पना विस्ताराने मांडावी लागेल. विकासाची व आनंदाची परिभाषा किंवा व्याख्या देखील ठरवावी लागेल.)

२. दुसरा अर्थ: बेकारी कमी आहे व औद्योगिक क्षेत्रात मजुरांना मागणी आहे. (हा मोठा गैरसमज आहे. मुळातच रोजगाराची व्याख्या नीटशी करावी लागेल. शहरात शंभर रुपये रोजावर काम करणारा मजूर जर झोपडपट्टीत राहून सडत असेल, तर तो रोजगार योग्य का? अनेक वेठबिगारांना तर पगारच मिळत नाही, मग ते मजूर गृहीतच धरले जात नाही का? अशा अनेक प्रश्नांची उकल करावी लागेल)

३. तिसरा अर्थ: कामगारांचे वेतनमान उच्च आहे. (हा भुलभुलैय्या आहे. सरकारी कर्मचारी हा कामगार गृहीत धरायचा का? त्याच्या कामाचे मूल्यांकन कसे करणार व त्याची प्रोडक्टिव्हिटी कशी ठरवणार? सरकारी व सार्वजनिक क्षेत्रात काम करणारा उच्च वेतन व सुविधा घेणारा अधिकारी हा खाजगी क्षेत्रात दोन दिवसात निरुपयोगी ठरतो व तातडीने बेरोजगार होऊ शकतो, मग केव्हा वेतन हाच आधार ठेवायचा कि उत्पादकता हा आधार घ्यायचा?).

४. उत्पादीत मालाला उठाव आहे. (मागणी व पुरवठा हे बाजाराचे तत्व इथे लागूच होत नाही. शेतीमाल प्रचंड पिकतो, त्याचे मूल्यांकनच चुकीचे होते आहे, त्यामुळे उत्पादनाचे आकडे चुकतात. त्यानंतर हा कृषिमाल ग्राहकाच्या हातातच पडत नाही, पुरवठा साखळीत कुठेतरी सडत पडतो व नष्ट होतो. मग कुठला व कुणाचा विकास झाला?).

५. सर्वात महत्वाचा अर्थ: देशाची आर्थिक प्रगती होते आहे. (अबब. किती धाडसी विधान. या पुस्तकात यावर वेगळा चॅप्टर लिहिला आहे)

अजूनही बरेच मुद्दे आहेत, ते मी विस्तारभयास्तव देत नाही. पण आर्थिक संस्था (बँकिंग सिस्टीम), आर्थिक व्यवस्था (इकॉनॉमिक सिस्टिम), इन्फ्लेशन (चलनवाढ व महागाई निर्देशांक), कंझमशन (खपत), डिमांड (मागणी), सप्लाय (पुरवठा) असे कितीतरी शब्द व संकल्पना जीडीपी च्या निर्धारणात महत्वाची भूमिका बजावतात. ते परिपूर्णपणे समजवून घेतल्याशिवाय जीडीपी चा नक्की अर्थ व प्रयोजन समजणार नाही. पण मूळ अर्थ, जीडीपी ग्रोथ म्हणजे विकास म्हणजे निर्मितीक्षमता वाढली हा मुद्दा आपण प्रथम समजावून घेऊ.

निर्मिती कुठे होते व कोण करतो

अर्थव्यवस्थेचे तीन मुख्य भाग आहेत. (१) प्रायमरी सेक्टर, ज्यात शेताचा व शेतीवर आधारित अनेक उद्योगांचा समावेश होतो (२) सेकेंडरी सेक्टर, ज्यात मॅनुफॅक्चरिंग म्हणजे औद्योगिक उत्पादन क्षेत्र प्रामुख्याने समाविष्ट होते व (३) टरशिअरी सेक्टर, ज्यात सर्व्हिस इंडस्ट्री म्हणजे सेवा उद्योग याचा समावेश होतो.

निर्मिती तिन्ही ठिकाणी होते. एक क्षेत्र दुसऱ्या क्षेत्राला प्रभावित करते.

सेवा क्षेत्र हे अर्थव्यवस्थेतील सध्याचे सर्वात मोठे क्षेत्र आहे. आजकाल जीडीपी असे न संबोधता ग्रॉस व्हॅल्यू ॲडिशन (GVA) असे म्हणतात तो GVA सेवा क्षेत्राचा आताच्या किमतीनुसार १००.४६ लाख करोड रुपयांचा आहे म्हणजे ग्रॉस GVA १८३.४३ लाख करोड रुपयांच्या ५४.७७%. त्याखालोखाल उद्योग क्षेत्राचे GVA मध्ये योगदान ५०.४० करोड रुपये म्हणजे २७.४८% इतके तर कृषी व कृषीआधारित क्षेत्राचे योगदान केवळ १७.७६% म्हणजे ३२.५७ करोड रुपये इतके आहे.

जर २०११-१२ च्या किमती आधारभूत धरल्या तर कृषी व कृषी आधारित क्षेत्र, सेवा क्षेत्र व उद्योग क्षेत्र यांचे योगदान अनुक्रमे १४.६५%, ३०.१०% व ५५.१७% इतके वेगळे असेल.

आपल्या भारतात कृषी क्षेत्र मोठे आहे, सगळ्यात जास्त निर्मिती व रोजगार कृषी क्षेत्र निर्माण करते, पण विरोधाभास म्हणजे या क्षेत्राचा जीडीपी मधील वाटा सर्वात कमी आहे. २०२० मध्ये कृषी व कृषी पूरक क्षेत्रात साधारण ४२% रोजगार निर्माण झाला परंतु जीडीपी मधला त्याचा वाटा साधारण १५% होता असा अंदाज आहे. अर्थात यात अनेक त्रुटी आहेत. स्वामिनाथन कमिटीने निर्धारित केलेल्या अनेक सुत्रांपैकी फक्त पहिले सूत्र (A२) वापरून चालणार नाही, A२ + FL देखील नाही, तर आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे C२ + ५०% ही आधारभूत किंमत MSP (किमान आधारभूत किंमत) म्हणून धरली तर शेती क्षेत्राचे जीडीपीतील योगदान भरपूर वाढेल. सध्याचे सरकारचे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन फक्त A२ वर आधारित आहे, जे अजिबात पुरेसे नाही.

औद्योगिक उत्पादन क्षेत्र जीडीपी च्या दृष्टीने सर्वात जास्त मोठे आहे, पण भारतात संघटित उत्पादन क्षेत्रापेक्षा असंघटित क्षेत्र सर्वात जास्त रोजगार पुरवते व असंघटित क्षेत्र सर्वात जास्त दुर्लक्षित आहे.

सेवा क्षेत्र केवळ आय टी मुळे प्रचंड नावारूपाला आले, यात सध्याच्या स्थितीला सगळ्यात जास्त रोजगार निर्माण होतात, पण जीडीपी मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा उत्पादन क्षेत्रापेक्षा कमीच आहे. मग हा विरोधाभास कसा निर्माण होतो? हा विरोधाभास घालवण्यासाठी काय उपाय योजना केली पाहिजे? याचे उत्तर फार मोठे आहे, त्यासाठी स्वतंत्र मोठा लेख किंवा पुस्तक लिहावे लागेल. अर्थात त्यासाठी अनेक प्रकारची आकडेवारी लागेल.


जीडीपी वाढला म्हणजे महागाई वाढते कि महागाई वाढली म्हणजे जीडीपी वाढतो? अर्थशास्त्रज्ञ व राजकीय विचारवंत यांच्या प्रचलित समजानुसार महागाई ही जीडीपी वाढीस पूरक असते. याचा सरळ अर्थ असा होतो हि सरकारचा भर जीडीपी वाढीवर असल्याने महागाई कमी करण्यापेक्षा सरकार महागाई वाढवण्याकडे जास्त लक्ष देते किंवा सरकारी कायदे, धोरणे, योजना हे सर्व महागाईपुरकच असते. म्हणजेच विकासवाढीचे सर्व दावे किती पोकळ आहेत हे तुमच्या लक्षात येतील. याचे सर्वात मोठे प्रमाण १ फेब्रुवारी २०२१ रोजी सादर केले गेलेला अर्थसंकल्प. महागाई वाढीसाठी सद्यस्थितीत सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पेट्रोल व डिझेलच्या किमती. सध्याचे सरकार या किमती कमी करण्याऐवजी त्यावर भरमसाठ सेस लावत सुटले आहे. २०२१ च्या ९.५% वित्तीय तुटीच्या बजेटमध्ये डिझेल वर ४ रुपये व पेट्रोल वर २.५ रुपये कृषी सेस या अर्थमंत्र्यांनी लावला आहे. म्हणजे महागाई अजून वाढणार. कारण इंधन दरवाढीचा महागाईवर कस्काडींग परिणाम होतो. डिसइन्वेस्टमेन्ट आणि असेट मोनेटायझेशन च्या नावाखाली देशाची महत्वाची अचल संप्पती सरकारने विकायला काढली आहे.

इन्फ्रास्ट्रक्चर वर पांच लाख खर्च करणार. त्यासाठी सर्वसामान्य नागरिक वाढीव कर देणार, पुन्हा त्याच रस्त्यावर अथवा सुविधांचा वापर करण्यासाठी टोल देणार आणि सगळ्यात कहर म्हणजे मग तेच प्रोजेक्ट्स सरकार काही वर्षांनी खाजगी कंपन्यांना विकणार. भयानक आहे हे सगळे.

शिक्षणावर व आरोग्यावर लाखो करोडोची नुसती तरतूद करून ठेवणार. पण तो पैसा सरकारच्या तिजोरीतच नाही, तो जाणार सर्वसामान्यांच्या खिशातून, बळजबरीने, त्यांची ऐपत नसतांना. अगोदरच नोटबंदी, जीएसटी, आर्थिक मंदी, कोविड यात पिचून निघालेल्या सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याऐवजी, जनतेच्या हातात पैसे देण्याऐवजी हे सरकार अगोदरच पिडलेल्या लोकांना अजूनच भरडणार आहे, त्यातून काय विकास साधणार आहे? असा भकास विकास काय कामाचा? यापूर्वी गोळा केलेल्या निधीचा काय उपयोग झाला, त्याचा सर्वसामान्यांना काय फायदा झाला? असे अनेक प्रश्न अतिशय गांभीर्याने चर्चिले गेले पाहिजेत. आर्थिक धोरणे ठरवतांना हा सर्वंकष विचार केला गेला नाही तर मग जीडीपी, जीवीए, विकास वगैरे सगळी फक्त मृगजळी आकडेवारी राहील, वस्तुस्थितीशी त्याचा अजिबात संबंध नसेल. सध्या तरी नाहीच.

(लेखक डॉ संदीप कडवे हे संपादक, आंतरराष्ट्रीय उद्योग सल्लागार, अर्थतज्ज्ञ, उद्योजक, गुंतवणूकदार, मेंटॉर व शेतकरी आहेत. सदरचा लेख त्यांच्या आगामी पुस्तकातील एक भाग आहे)

○○○



# बंगला

- कवी गणेश भाऊसाहेब पोटफोडे, दुबई

केरळमध्ये माझा बंगला आहे
बंगला कसला व्हिलाच म्हणा
अरब बांधतात ना?
अगदी तसाच

अमुक एक कोटींचा बंगला असणं
म्हणजे मल्याळी लोकांच भूषण
बायकोचा आग्रह आणि शेजाऱ्यांचा शह
म्हणून जीवाचं रान करून
बांधून टाकला एकदाचा

किती कष्ट घेतले सांगू?
कवडी रेवडी करून पैसा उभारला
त्यासाठी मला इथं मन मारून
अगदीच सामान्यपणे जगावं लागलं

कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी
कमी खर्चाच्या छोट्याश्या खोलीत
मला इथं संसार मांडावा लागला

शेजाऱ्यांच्या बंगल्यापेक्षा
माझा सरस दिसावा यासाठी
मी सर्व आधुनिक गोष्टी वापरल्या

भारी टाईल्स, फर्निचर, रंगरंगोटी वगैरे
आणि बरं का!
सगळा बंगला भरून गेलाय इंटेरीयरने

पण!
त्या आलीशान बंगल्यात
सध्या कुणीच राहत नाही
एका गरीब बिचाऱ्या चेचीकडे
चावी देवून ठेवलीय
आठवड्यातून एकदा सफाई करण्यासाठी

रिकामा बंगला आमची वाट पाहातोय
आम्ही परतण्याची
कायमचं नाही
निदान सुट्टीसाठी तरी.....

ooo

# वर्क फ्रॉम होम (WFH)

- धवल नांदेडकर



सी.ए.धवल नांदेडकर हे यु ए ई च्या फुजेरा या राज्यात, म्हणजे दुबईपासून १२१ किमी अंतरावर राहतात. तेथे त्यांचा प्रुडेन्शिअल ऑडिटिंग हा सी ए, फिनान्शिअल व अकाउंटिंग सर्विसेस चा बिझनेस आहे. सौ नीलम नांदेडकर त्यांना या व्यवसायात समर्थपणे साथ देतात.

कोरोना च्या काळात घरून काम करणे हाच पायंडा पडला गेला. याची पायाभरणी साधारण २००० साली झाली असावी. कारण त्याच सुमारास इंटरनेट चा बिझनेस साठी वापर मोठ्या प्रमाणावर सुरु झाला होता. त्यानंतर फोर जी मोबाईल तंत्रज्ञान आल्यावर याला अजूनच बळ मिळाले. कोरोनाच्या काळात सर्वसामान्य लोकांना खूप त्रास झाला, परंतु त्यातून मार्ग शोधून आलेल्या संकटाचे संधीत रूपांतर करण्याचे सी ए धवल नांदेडकर व त्यांच्या पत्नी नीलम नांदेडकर यांनी ठरवले. त्यांचा अनुभव त्यांच्याच शब्दात.

हाताची पाच बोटं एकसारखी नसतात. पाच बोटांचे पाच मुद्दे, थोडक्यात.

**Part I - Work from anywhere**

१९९६ मध्ये घरी कंप्यूटर घेतला आणि तो इंटरनेट ला जोडला. त्या आधी सगळ्यांना सांगायचो, फोन वर तासभर बोला, फक्त ₹ २० लागतात, खरंच भेटायची गरज असेल तेव्हा प्रवास करून भेटू. आता ई-मेल करा, काम करून तुम्हाला ई-मेल करतो, सांगायला सुरुवात केली. नासिक मध्ये बसून मुंबईची कामं सर्रास करायचो. महिना दोन महिन्यातून एकदा मुंबईला जायचो आणि ज्यांना भेटायचं त्यांना भेटून परत यायचो. सगळ्यांचं काम घर बसल्या करायचो. अर्थात, घर, ऑफिस आणि आई-वडिलांची फॅक्टरी एकाच ठिकाणी होते, त्यामुळे वेळ आणि एनर्जी भरपूर असायचा.

२००६ मध्ये फुजैरः ला काम सुरू केलं. जसं मुंबईहून नासिक, तसं दुबईहून फुजैरः - साधारण दीडशे किलोमीटर, पण सुसाट रस्ता आणि वेगवान गाड्यांमुळे दीड तासात प्रवास होतो. भेटायची गरज नाही, ई-मेल वर काम पाठवा, हा पाठ सुरू ठेवला. बर्याच प्रयत्नानंतर इथे सुद्धा घर आणि ऑफिस एकाच इमारतीत जमवलं. मोठ्या शहरात बर्याला शंभर क्लायंट आरामात बनतात; इथे राहून आणि असा "न भेटण्याचा" अट्टाहास करून त्याच्या २०% बनले तरी खूप होतं. पण, वेळ आणि एनर्जी वाचवली; आणि फावल्या वेळात स्वतःची करमणूक कुठेही कमी नाही पडू दिली.

सोबत काम करणार्यांना कुठूनही कधीही काम करायची सवय लावली. कधीही सुट्टी घ्या, कुठूनही काम करा, सुट्टीत सुद्धा दोन तास काम करून क्लायंटच्या संपर्कात रहा, व्हॉटसॅप वापरा, कधीही फोन उचला आणि मिस्ड कॉल ला उत्तर द्या. तुम्ही कुठे आहात त्याने फरक नाही पडला पाहिजे, ही सवय लावली होती. सवय कठीण आहे. ९०% लोकांना जमत नाही;

पण ज्या १०% लोकांना जमते, ते टिकले होते.

२०२० मध्ये कोविड आला. फुजैरः मध्ये काम करणार्यांना काही फरक पडला आहे असं जाणवलं सुद्धा नाही. नासिक मध्ये काम करणार्यांना संचारबंदी डिक्लेअर केल्याच्या दीड तासात कंप्यूटर घरी पोहचवण्यात आले. आणि दुसर्या दिवशी त्यांनी घरून कामं सुरू केली.

जगभरातल्या कदाचित १०% कंपन्यांनी माणसं कमी नाही केली. आणि कदाचित ५% कंपन्यांनी पगार कमी नाही केले. त्यातले आम्ही.

**Part 2 - Weekday tourist**

कधीही सुट्टी घेणे आणि कधीही काम करण्याचा एक फायदा नक्की असतो. आम जनता सुट्टीच्या दिवशी गर्दी करते. आम्ही सुट्टीत कामं करतो आणि भर आठवड्यात पिकनिक ला जातो.

वास्तविक पर्यटन तीन कारणांकरता प्रामुख्याने केले पाहिजे. शीण घालवायला एखाद्या चांगल्या रिसॉर्टला जाऊन आठवडा भर आराम करणे किंवा एखाद्या जंगलात किंवा तत्सम inaccesible ठिकाणी अज्ञातवासात जाऊन महिना भर काहीतरी creative करणे. निसर्गाची किंवा इतिहासाची किंवा adventure ची किंवा प्राण्यांची नितांत आवड असणार्याने आपल्या आवडीच्या ठिकाणी जाऊन आपल्या आवडत्या गोष्टीचा आस्वाद घेणे. आपल्या कडे जमलेला गरजे पेक्षा जास्त पैसा आणि pent up energy वायफळ वाया घालवायला कुठल्याही लोकप्रिय ठिकाणी जाऊन येणे. जास्तीत जास्त पर्यटक तिसर्या वर्गात मोडतात.

चौथ्या वर्गातल्या आमच्यासारख्या आळशी लोकांना हवं ते ठिकाण आणि हवे ते प्राणी couch potato सारखे TV वर बघता आले, ह्याचं सुख सांगायला पुस्तक कमी पडेल. हो, तो feel नाही आहे, पण मग इतक्या पैशात इतकंच मिळतं, आणि ते ठीक आहे.

आणि घरी बसणाऱ्या अश्या बर्याच लोकांनी पुन्हा पुस्तकं वाचायला सुरू केलं, गाणी रेकॉर्ड केली, वाद्य वाजवायला घेतलं, शिल्पकारी किंवा चित्रकला हाती घेतली आणि बरंच काही केलं. वेळ सार्थी लावला. जे म्हातारे कोतारे किंवा कमी शिकलेले मला हे आजकालचे फोन समजत नाही करायचे, ते पटा पटा ऑनलाइन झाले आणि सगळ्यांच्या संपर्कात आले. जग बदललं.

**Part 3 - The new normal**

चार पदरी चार चार रस्ते आहेत, दुबईत. पण सकाळ संध्याकाळ तुंबायचे. प्रत्येकाला कुठून तरी कुठे तरी जायचं असायचं. सरकार ने किती रस्ते बनवायचे? आर्थिक सुबत्ता वाढली होती. प्रत्येकाकडे गाडी आली तर कितीही बनवले तरी कमी पडणार होते.

घरी बसण्याची सवय लागायला वेळ लागतो आहे, पण ज्यांना समजतं आहे, ते सुखाने ह्याला embrace करत आहेत. बँकांनी उगाच मोठी मोठी जागा घेऊन ठेवली होती. सगळंच ऑनलाइन होत असल्याने त्यांनी आवरतं घेऊन शाखा कमी केल्या. कुणालाही काहीही अडचण जाणवत नाही आहे. आणि त्याच किमतीत घरबसल्या सामान मागवायची सवय लागते आहे.

हळू हळू, सगळ्यांच्या सवयी बदलत आहेत. आणि कामं करायच्या पद्धती बदलत आहेत.

कित्येक लोकांना हे अंगवळणी पडायला जड जातं आहे. प्रत्येक युगात असे लोक असतात. ते सिस्टीम मधून बाहेर पडतात. ह्यावेळी मात्र त्यांची संख्या खूप जास्त आहे. पण, evolve or perish च्या कायद्याने ते बदलतील किंवा थप्पीला लागतील. ते जाणो आणि त्यांचं नशीब.

आम्ही गेले अडीच दशक घसा कोरडा होई पर्यंत सांगत होतो, की भेटायची गरज नाही, कुठूनही काम करता येतं. आणि एका झटक्यात सगळ्यांना हा साक्षात्कार कोविड ने करून दिला. आमची कामं वाढली. जिथे महिना पंधरवड्याला क्लायंट शोधून आणावा लागायचा, तिथे आठवड्याला क्लायंट स्वतः आमचा शोध घेऊन यायला लागले. आणि ह्याचा फायदा घेऊन पुढच्या वर्षी आम्ही जो संपूर्ण GCC मध्ये काम करू असा विचार केला होता, तो ह्याच वर्षी यशस्वीपणे राबवला.

**Part 4 - Market equilibrium**

घरी राहून कामं केली तर कामं स्वस्तात होतात. पण घर मोठं लागतं. पण मग ते घर गावी असलं तरी चालतं. कित्येक लोकांनी आपल्या आई वडिलांसोबत राहून काम करायला सुरुवात केली आहे. कित्येक जणं पुढच्या काही वर्षात करायला लागतील.

पण ह्या सगळ्या गोष्टींमुळे इंधन वाचतं आणि कार्यक्षमता वाढते. कमी वेळात आणि कमी पैशात जास्त काम होतं. सगळ्या कामांच्या किंमती कमी होतील. आमचा जो price किंवा cost advantage होता, तो सगळ्यांना मिळायला सुरुवात

होईल. आणि सरासरी किंमती आणि पगार कमी होतील. ह्याचा बाजारपेठ बर्यापैकी अस्थिर करणारा इफेक्ट आपल्याला येत्या काही वर्षात बघायला मिळेल.

ह्याचाच फायदा घेण्याकरता - किंवा पूर्वतयारी म्हणा - आम्ही आमचा विस्तार वाढवला आहे. २०१५ पर्यंत आम्ही म्हणायचो की २०० km दुरून काम करतो. २०२० पर्यंत म्हणायचो की २,००० km दुरून सुद्धा काम करू शकतो. आता आम्ही म्हणतो की अजून २०,००० km दुरून काम करू शकतो - आणि दोन्ही बाजूने २०,००० km पकडले, तर ४०,००० km ची पूर्ण पृथ्वी आम्ही व्यापली असं आम्ही आता म्हणतो आहे.

मराठी पाऊल पडतं पुढे? नव्हे, मराठी पाऊल तिथेच रोवलं आहे - फक्त reach वाढवली.

**Part 5 - Cascading effect**

पण हे एक महाकाय disruption आहे. सागरी व्यापार जेंव्हा सुरू झाला तेंव्हा जगाने एक प्रचंड झेप घेतली, पण त्याचा दुष्परिणाम colonisation च्या रुपात दिसला. जगातील बहुतांश native cultures नेस्तनाबूत झाले.

Industrial revolution ने सुबत्ता आणली. पण पारंपरिक शिक्षण पद्धतीने निर्माण होणारे व्यक्तिमत्व बनणे बंद झाले आणि मनुष्याला मशीन सारखं घडवणारी शिक्षणपद्धती निर्माण झाली.

फोन आणि कंप्यूटर आले तेंव्हा सुद्धा असाच बदल दिसला. आणि आता ह्या नवीन कार्यपद्धतीने काय होईल, ते बघायचं बाकी आहे. खरी कसरत पुढचे दोन वर्ष होईल. ज्यांनी आत्ता पर्यंत तग धरला होता, त्यांचे बांध आता फुटतील आणि २०२१ मध्ये त्यातले कित्येक बंद होतील आणि कित्येक नावे प्रकल्प सुरू करतील. काही survive होतील, काही evolve आणि काही perish. जग बदलेल.

कसं बदलेल, ते नक्की सांगता नाही येत. कदाचित, सगळं पुन्हा जसं होतं तसं होईल. कदाचित जगातले फक्त काही भाग बदलतील. भारतातल्या किंवा बर्याच देशांमधल्या जर गावांकडे आपण बधितलं, तर गाड्या, ढत आणि फोन चा प्रभाव सोडला तर जसे ते वीस तीस हजार वर्षांपूर्वी रहात होते, तसेच आजही राहतात असं वाटतं. तसं बरेच लोक कदाचित काहीही न झाल्यासारखेच जगत राहतील. किंवा कदाचित एकामुळे दुसरे आणि दुसऱ्यामुळे तिसरे बदल घडत जातील आणि सगळी व्यवस्था बदलेल.

काय चांगलं आणि काय वाईट हे ठरवणारे आपण कोणी नाही. काय होईल आणि काय नाही, हे ही सांगता येणं कठीण आहे.

चला, बघू, पुढे काय होतं ते. २०२१ चा धडा हा २०२० पेक्षा कठीण असणार आहे एव्हडे नक्की. कोविड कोर्स चे आपण सगळे sophomore. आणि २०२२ ला कोण graduate होऊन उत्तम मार्गाने उत्तीर्ण होतो, ते बघू. तो पर्यंत जगात सगळयांना vaccine तर नक्कीच मिळालं असणार. त्या farewell party ला भेटू आणि मग गाऊ, पापा केहते हैं बड़ा नाम करेगा, बेटा हमारा ऐसा काम करेगा, मगर ये तो कोई न जाने, के मेरी मंजिल हैं कहाँ.

- धवल नांदेडकर, फुजेरा, यु ए ई

○○○

## स्नेह -वन्दन

-सतीश शर्मा, इंदौर

**त्रुटि रहित न मैं हूँ,**
**न तुम हो,**
**दोनों मनुष्य हैं, भगवान**
**न मैं हूँ, न तुम हो।**
**परस्पर हम दोष देते हैं, एक**
**दूसरे को, पर अपने अंदर**
**झाँकता न मैं हूँ,न तुम हो।**
**भ्रम ने पैदां कर दी इंसानों में**
**दूरियाँ, पर सच में बुरा**
**न मैं हूँ, न तुम हो।**